# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## माहिती व तंत्रज्ञान विभाग

## जाहीर प्रकटन क्रमांक-०१/२०२६-२०२७ दि. ०४ / ०५ /२०२६

सांगली मिरज आणि आणि कुपवाड शहर महानगरपालिका, माहिती व तंत्रज्ञान विभागाने खाली नमूद केलेल्या कामासाठीची निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन मागविण्यात येत आहेत.

| अनु क्रं | कामाचा तपशील | निविदा रक्कम रू. | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | **सां.मि.कु मनपाकडील जनगणना कामी अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणेकामी प्रोजेक्टर व अनुषंगिक साहित्य भाडेतत्वावर घेणेकामी मान्यता मिळणेबाबत** | **१०,००,०००/-** | ७५०/- | **जनगणना चे कार्यकाळ संपेपर्यंत** |

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही online राहील. निविदा धारकाने स्वत:चे डिजीटल सिग्नेचर वापरुन निविदा भरण्याची आहे. सदर निविदा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलद्वारे भरण्याची आहे. (offline निविदा स्विकारली जाणार नाही)

२) वरील कामगिरीसाठी बयाणा रक्कम अंदाजपत्रकीय दराच्या १% राहील व निविदा फॉर्म खरेदी फी रु.७५०/- (पाचशे ) + शासकीय फी) मात्र असून, सदर रक्कम online भरण्याची आहे.

३) सदर निविदे साठी सुरक्षा अनामत रक्कम ५ % राहील.

४) सदर कामगीरी पार पाडण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचे स्पेसीफिकेशन सदर दरपत्रक सुचना क्र.०१ सोबत लगत केली आहे.

५) लिफाफा क्र.२ म्हणजे BOQ मध्ये दर भरण्याचे आहेत. BOQ मधील एकुण रक्कमेवर L१ ठरविण्यात येईल.

६) मनपाच्या नमून्यामध्ये व शर्ती-अटी नुसार करारपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

७) या कामाच्या ई-निविदा कालावधी दिनांक -०४/ ०५ /२०२६ ते ११/०५ /२०२६ सायं. ४.०० वाजे पर्यंत राहील.

८) वरील कामाची ई-निविदा दि. १२/०५ /२०२६ रोजी सायं.४.०० वाजता उघडण्यात येईल.

९) कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

१०) कोणतीही निविदा स्विकारणे, नाकारणे,किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे, तसेच निविदा शर्ती अटी मध्ये बदल करणे, निविदा वेळापत्रकामध्ये बदल करणे किंवा इतर अन्य सर्व बाबींचा अधिकार मनपा आयुक्त तथा प्रशासक यांचा राहील. याबाबत कोणतीही तक्रार , हरकत , नोटीस यांचा विचार केला जाणार नाही.

**प्र.सिस्टीम मॅनेजर**
**सां.मि.कु मनपा**

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## माहिती व तंत्रज्ञान विभाग

## निविदा शर्ती व अटी (जाहीर प्रकटन क्र. ०१/२०२६-२७)

कामाचे नाव :- **सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेकडील जनगणनाकामी अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणेकामी प्रोजेक्टर व अनुषंगिक साहित्य भाडेतत्वावर घेणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**निविदा रक्कम रू. १०,००,०००/-**

<u>निविदा शर्ती व अटी :-</u>

1) संपूर्ण निविदा प्रक्रिया ही online राहील. निविदा धारकाने स्वत:चे डिजीटल सिग्नेचर वापरुन निविदा भरण्याची आहे. सदर निविदा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलद्वारे भरण्याची आहे. (offline निविदा स्विकारली जाणार नाही)
२) वरील कामगिरीसाठी बयाणा रक्कम अंदाजपत्रकीय दराच्या १% राहील. (रु. १०,०००/-) online भरण्याची आहे.
३) निविदा फॉर्म खरेदी फी रु. ७५०/- (५००) + शासकीय फी) मात्र राहील.
४) सदर निविदे साठी सुरक्षा अनामत रक्कम हे ५ % राहील.
५) लिफाफा क्र.१ :- मध्ये
   i. वयाणा चलन (Online) भरलेले रक्कमेची प्रिंट
   ii. सदर शर्ती अटी मान्य असल्याचे सही / शिक्का असलेले पत्र,
   iii. तत्सम कामाच्या अनुभवाचा व काम पूर्ण केल्याचा दाखला (Work Order)/ work Completion Cert. etc.) कागदपत्रांचा समावेश असावा.
   iv. निविदेतील रक्कमे इतके किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेचे सदर प्रकारच्या कामाचे अनुभव असलेचे दाखले
   v. वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) व GST-R३ लगत.
   vi. पॅनकार्डची प्रत (कंपनी / भागीदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागीदारी संस्थेच्या नावाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक आहे. प्रोप्रायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोप्रायटरच्या नावाचे असावे).
   vii. निविदाधारकांचे (Bidder) कंपनी / भागीदारी संस्था / प्रोपायटरी फर्म्सचे संबंधित नोंदणी प्रमाणपत्र (कंपनी असल्यास कंपनी अधिनियमांतर्गत MSME सर्टिफिकेअ,नोंदणी प्रमाणपत्र, भागीदारी संस्था असल्यास भागीदारी संस्था नोंदणी प्रमाणपत्र व आस्थापना अधिनियमांतर्गत (गुमास्ता) नोंदणी प्रमाणपत्र).
   viii. सरासरी वार्षिक उलाढाल: निविदा धारकाची मागील ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल कामाच्या किंमतीच्या किमान ७५% असावी. यामध्ये उलाढाल प्रमाणपत्र (Turnover Certificate) सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले असावे.
   ix. नेटवर्थ: कंत्राटदाराचे नेटवर्थ हे पॉझिटिव्ह असावे.
   x. निविदाधारकाने निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता दर्शविणारे रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र.

6) लिफाफा क्र.२ म्हणजे BOQ मध्ये दर भरण्याचे आहेत. BOQ मधील एकुण रक्कमेवर L१ ठरविण्यात येईल.

७. उपकरणे कार्यक्षम स्थितीत असावीत; दोष आढळल्यास तत्काळ बदल करणे बंधनकारक.

८. एजन्सीला कार्यआदेश दिलेपासुन ते **जनगणनेचा कामकाज** संपेपर्यंत तांत्रिक मदत पुरवावी लागेल.

९. जनगणा ही बाब आत्याआवश्यक असल्याने स्थानिक पुरठादारास प्राधान्य दिला जाईल.

९. वाहतूक, इंधन, मजूर, वीज व इतर सर्व खर्च दरात समाविष्ट असावा.

१०. महानगरपालिका आवश्यकतेनुसार साहित्याचे प्रमाण वाढवू किंवा कमी करू शकते.

११. उपकरणांचे नुकसान, चोरी, अथवा कार्यात अडथळा आल्यास जबाबदारी एजन्सीची राहील.

१२. टेंडरमध्ये नमूद दर हे सर्व करांसहित *(Inclusive of all taxes)* असावेत.

१३.माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून कळविलेनंतर कामगिरीच्या ठिकाणी प्रोजेक्टर व इतर अनुषंगिक साहित्य वेळेत पोहच करून त्यांचे Installation करण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

१४.कोणत्याही तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणास्तव निविदा रद्द करण्याचा सर्वाधिकार महानगरपालिकेकडे राहील.

**१५. सदर कामची सुरक्षा अनामत रक्कम कामाची मुदत संपले नंतर एक महिन्यानी अदा करणेत येईल.**

१६.कामाचे आदेश दिलेल्या दिनांकापासून (मौखिक / लेखी) सत्वर मक्तेदाराने कामगिरी सुरू करणे बंधनकारक राहील.

१७.उक्त निविदा प्रक्रियेमधील सर्वात कमी दराच्या निविदाधारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किंमतीपेक्षा १० टक्केपेक्षा जादा/कमी असेल तर सदर निविदा धारकाने दर जादा/कमी भरलेबाबत लेखी खुलासा मनपास देणेत यावा.

१८.सदरचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दर असल्यामुळे त्यास कोणतीही दरवाढ मागता येणार नाही.

१९.सदर अटी व शर्तीमध्ये सुधारणा करणे अटी-शर्ती वाढविणे /कमी करणेचा अधिकार मा. आयुक्त/ मा.अति आयुक्त / सिस्टीम मॅनेजर यांना राहील.

२०.अंदाजपत्रकीय रक्कम ही माहिती व तंत्रज्ञान विभागाने साहित्याच्या आवश्यकतेप्रमाणे व मागणीप्रमाणे कमी जास्त होवू शकते.

२१.मक्तेदाराची मुदत संपलेनंतर जर पुरविलेल्या वस्तू मध्ये दोष आसले तरीही ते बदलून अन्यथा दुरूस्त करून देणे मक्तेदारास बंधनकारक राहील.

२२.सदरचे काम हे E-governance शी निगडीत असलेने मागणी केलेले साहित्य तात्काळ पुरविणेचे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **सिस्टीम मॅनेजर**<br>**सां.मि.कु. मनपा** | **मुख्य.लेखाधिकारी**<br>**सां.मि.कु.मनपा.** | **मुख्य.लेखापरीक्षक**<br>**सां.मि.कु.मनपा.** | **मा.अति.आयुक्त-२**<br>**सां.मि.कु.मनपा.** |